# आपले संविधान

(नागरिकशास्त्र आणि प्रशासन)

इयत्ता सातवी



## नागरिकशास्त्र इयत्ता सातवी : अभ्यासक्रमाची उद्दिष्टे

१. भारतीय संविधानात अंतर्भूत असलेली मूल्ये रुजवणे.

२. जबाबदार व क्रियाशील नागरिकत्वाची जाण निर्माण करणे.

३. समाजातील दुर्बल घटक व महिला यांच्या सबलीकरणाची आवश्यकता ठसवणे.

४. नैसर्गिक व मानवनिर्मित पर्यावरण यांच्या सहसंबंधांविषयीच्या जाणिवा विकसित करणे.

५. भारतीय संविधानातील मूलभूत हक्क आणि कर्तव्ये यांच्याविषयी जाणीव निर्माण करणे.

६. भारतातील लोकप्रशासनाचे स्थूल स्वरूप समजण्यास मदत करणे.

अभ्यासक्रमाचा भर विद्यार्थ्यांमध्ये नागरी जाणिवा निर्माण करण्यावर आहे. केवळ त्यांना माहिती देणे, हा मर्यादित हेतू नाही. आपल्या देशाचा राज्यकारभार कसा चालतो, संविधानातून कायद्याचे राज्य कसे प्रस्थापित होते, जनतेचा सहभाग व जनतेचे शासनावर नियंत्रण कसे महत्त्वाचे असते इत्यादी बाबींची ओळख सोप्या पद्धतीने विद्यार्थ्यांना करून देण्यात आली आहे. भारतीय लोकशाहीपुढील नव्या आव्हानांची चर्चा प्रथमच पाठ्यपुस्तकात करण्यात आली आहे. राजकीय घडामोडी व घटनांचा विद्यार्थ्यांना सहजपणे अर्थ लावता येईल व त्या समजावून घेता येतील, हा हेतूही पाठांचे लेखन करताना डोळ्यांसमोर ठेवला आहे. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणिवा निर्माण व्हाव्यात, सार्वजनिक प्रश्नांकडे पाहण्याचा निकोप दृष्टिकोन तयार व्हावा, या दृष्टीने या माहितीचा उपयोग होईल. धर्मनिरपेक्षता, स्त्री-पुरुष समानता, सहभागातून विकास, सहकार्य इत्यादी मूल्यांना पाठ्यपुस्तकात अधोरेखित केले आहे.

□□□

शिक्षणखात्याचा मंजुरी क्रमांक
प्राशिसं/२००७-२००८/मंजुरी/५०५(२०)/९६ दिनांक २९.१२.२००७

# आपले संविधान

## (नागरिकशास्त्र आणि प्रशासन)

## इयत्ता सातवी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,पुणे.

प्रथमावृत्ती : जानेवारी, २००८
पुनर्मुद्रण : जुलै, २०१०

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे–४११ ००४.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

संपादक मंडळ :
प्रा. साधना कुलकर्णी
श्री. श्रीकांत थावरे
श्री. सुभाष तोडकर
डॉ. बाळ कांबळे
श्री. मधुकर नरडे
श्री. मोगल जाधव, समन्वयक

लेखक :
प्रा. चैत्रा रेडकर

संयोजक :
श्री. मोगल जाधव
विशेषाधिकारी, इतिहास व नागरिकशास्त्र
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

मुखपृष्ठ व सजावट :
श्री. शरद प्रभुदेसाई

निर्मिती :
श्री. राजेंद्र विसपुते, निर्मिती अधिकारी
श्री. प्रभाकर परब, निर्मिती सहायक

अक्षरजुळणी :
मुद्रा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

कागद :
७० जी.एस.एम., क्रीमवोव्ह

मुद्रणादेश :
N / PB / 11-12 / 0666 (50,000)

मुद्रक :
जयगणेश ऑफसेट, पुणे

प्रकाशक:
श्री. विवेक उत्तम गोसावी,
नियंत्रक,
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई–२५.

# भारताचे संविधान

प्रास्ताविका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस :
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे स्वातंत्र्य;
दर्जाची व संधीची समानता;
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;
आमच्या संविधानसभेत
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करून स्वत:प्रत अर्पण करत आहोत.

# प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा - २००० आणि २००५' अनुसार महाराष्ट्र राज्यात 'प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम - २००४' तयार करण्यात आला. या अभ्यासक्रमाची कार्यवाही २००६-२००७ या शालेय वर्षापासून क्रमशः सुरू झाली आहे. अभ्यासक्रमात इतिहास व नागरिकशास्त्र हे विषय इयत्ता तिसरीपासून सुरू करण्यात आले आहेत.

अभ्यासक्रमानुसार इयत्ता पाचवीपर्यंत इतिहास व नागरिकशास्त्र या विषयांचा समावेश एकाच पाठ्यपुस्तकात करण्यात आला आहे. इयत्ता सहावी ते आठवी या उच्च प्राथमिक स्तरावर नागरिकशास्त्र आणि प्रशासन या विषयास अभ्यासक्रमात स्वतंत्र दर्जा दिला असून शासनमान्य अभ्यासक्रमानुसार मंडळाने इयत्ता सातवीचे प्रस्तुत पाठ्यपुस्तक तयार केले आहे. हे पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना आम्हांला आनंद वाटतो.

अध्ययन-अध्यापन प्रक्रिया बालकेंद्रित असावी, स्वयंअध्ययनावर भर दिला जावा, प्राथमिक शिक्षणाच्या अखेरीस विद्यार्थ्यांनी 'विहित क्षमता' प्राप्त कराव्यात, अध्ययन व अध्यापन प्रक्रिया आनंददायी व्हावी असा व्यापक दृष्टिकोन समोर ठेवून हे पुस्तक तयार केले आहे. आपल्या देशाचे संविधान, त्यातील नागरिकांच्या स्वातंत्र्य व हक्कांविषयीच्या तरतुदी, शासनाचे अधिकार व त्यावरील मर्यादा, न्यायव्यवस्था इत्यादी विषयांचे मार्गदर्शन या पाठ्यपुस्तकात केले आहे. पाठांच्या शेवटी चौकटीत दिलेली माहिती विद्यार्थ्यांचे अध्ययन अधिक परिणामकारक करू शकेल. त्यावर प्रश्न विचारणे अर्थातच अपेक्षित नाही. स्वयंअध्ययन सुलभ व्हावे, म्हणून पुस्तकात प्रत्येक पाठावर स्वाध्याय दिले आहेत.

पाठ्यपुस्तक जास्तीत जास्त निर्दोष व दर्जेदार व्हावे, या दृष्टीने महाराष्ट्राच्या सर्व भागांतील निवडक शिक्षक, तसेच काही शिक्षणतज्ज्ञ व विषयतज्ज्ञ यांच्याकडून या पुस्तकाचे समीक्षण करण्यात आले. आलेल्या सूचना व अभिप्राय यांचा काळजीपूर्वक विचार करून या पुस्तकाला अंतिम स्वरूप देण्यात आले आहे. संपादक मंडळ, लेखक आणि चित्रकार यांनी अतिशय आस्थेने हे पुस्तक तयार केले आहे. मंडळ या सर्वांचे मन:पूर्वक आभारी आहे.

विद्यार्थी, शिक्षक व पालक या पुस्तकाचे स्वागत करतील, अशी आशा आहे.

(एस. एन. पवार)
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : १८ जानेवारी, २००८

# अनुक्रमणिका


| क्रमांक | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | भारताचे संविधान | १ |
| २. | संविधानाची प्रास्ताविका | ७ |
| ३. | नागरिकांचे मूलभूत हक्क आणि कर्तव्ये | ११ |
| ४. | संविधानातील मार्गदर्शक तत्त्वे | १८ |
| ५. | भारतीय लोकशाही | २३ |
| ६. | संघशासन - कायदेमंडळ | २९ |
| ७. | संघशासन - कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ | ३५ |
| ८. | घटक राज्यशासन | ३९ |
| ● | मुखपृष्ठ - संसद भवन: दिल्ली | |

# १. भारताचे संविधान

आपल्या देशाचा राज्यकारभार आपल्या संविधानाप्रमाणे चालतो. आपले संविधान कसे तयार केले, याविषयीची माहिती आपण या पाठात घेणार आहोत.

संविधानानुसार राज्यकारभार करण्याचे तत्त्व बहुतेक सर्वच देशांनी स्वीकारले आहे. असे असले तरीही प्रत्येक देशाच्या संविधानाचे स्वरूप वेगळे असते, कारण प्रत्येक देशाची समाजरचना, परंपरा, इतिहास आणि भौगोलिक रचना भिन्न असते. प्रत्येक देशाच्या गरजा आणि उद्‌दिष्टेही वेगवेगळी असतात. त्यांस अनुसरून प्रत्येक देश आपापले संविधान निर्माण करण्याचा प्रयत्न करतो.


**संविधान** : देशाच्या राज्यकारभारासाठी तयार करण्यात आलेले मूलभूत कायदे ज्या ग्रंथात एकत्रित आहेत, त्यास 'संविधान' असे म्हणतात. संविधानास 'राज्यघटना' असेही म्हणतात. नागरिकांचे हक्क, शासनसंस्थेची रचना व अधिकार हे सर्व संविधानात नमूद केलेले असते.

**संविधानाचे महत्त्व** : संविधानात नमूद केलेल्या तरतुदींनुसार राज्यकारभार करण्याचे अनेक फायदे असतात. संविधानातील तरतुदींमुळे आपल्या लोकप्रतिनिधींना नियमांच्या चौकटीत राहून राज्यकारभार पाहता येतो. त्यांच्याकडून अधिकाराचा दुरुपयोग होण्यास प्रतिबंध करता येतो. नागरिकांचे स्वातंत्र्य आणि हक्क सुरक्षित राहतात. नागरिकांना त्यांच्या हक्कांची हमी संविधानातील तरतुदींद्‌वारे दिली जाते.

संविधानामुळे शासनाचे अधिकार व त्यावरील मर्यादा स्पष्ट होतात. जनतेचे स्वातंत्र्य सुरक्षित राहते. जनतेचा राज्यकारभारातील सहभाग वाढतो, म्हणून संविधानानुसार राज्यकारभार केल्यास लोकशाही बळकट होते.

**भारताच्या संविधानाची निर्मिती :** आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळणार हे निश्चित झाल्यावर १९४६ साली संविधान निर्मितीची प्रक्रिया सुरू झाली. 'स्वतंत्र भारताचा राज्यकारभार ब्रिटिशांनी तयार केलेल्या कायद्यानुसार चालणार नाही, तर तो भारतीयांनी स्वत: तयार केलेल्या कायद्यानुसार चालेल,' असा स्वातंत्र्य चळवळीतील नेत्यांचा आग्रह होता, म्हणून संविधानाच्या निर्मितीसाठी संविधान सभेची स्थापना करण्यात आली.

**संविधान सभा :** इंग्रज सरकारने राज्यकारभाराच्या सोईसाठी मुंबई प्रांत, बंगाल प्रांत व मद्रास प्रांत यांसारखे काही विभाग पाडले होते. या प्रांतांतील राज्यकारभार तेथील लोकप्रतिनिधींमार्फत चालवला जात होता. संविधान सभेसाठी काही सदस्यांची निवड या लोकप्रतिनिधींनी केली. त्या काळात देशातील काही भागांचा कारभार संस्थानिक पाहत होते. अशा भागांना 'संस्थाने' म्हणत. या संस्थानांचेही काही प्रतिनिधी संविधान सभेत होते. अशा प्रकारे प्रांत आणि संस्थानांच्या प्रतिनिधींची मिळून संविधान सभा तयार झाली.



डॉ. राजेंद्रप्रसाद



पं. जवाहरलाल नेहरू



सरदार वल्लभभाई पटेल



मौलाना आझाद

भारताच्या संविधान सभेत २९९ सदस्य होते. या सभासदांमध्ये सर्व जातिधर्मांचे, विविध भाषा बोलणारे व विविध व्यवसाय करणारे लोक होते.

संविधान सभेत डॉ. राजेंद्रप्रसाद, पं. जवाहरलाल नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना अबुल कलाम आझाद, सरोजिनी नायडू , जे. बी. कृपलानी, राजकुमारी अमृत कौर, दुर्गाबाई देशमुख, हंसाबेन मेहता असे अनेक मान्यवर सदस्य होते. बी. एन. राव या कायदेतज्ज्ञाची संविधान सभेचे कायदेविषयक सल्लागार म्हणून नेमणूक झाली होती.

**संविधान सभेचे कामकाज :** संविधान सभेची पहिली बैठक ९ डिसेंबर, १९४६ रोजी झाली. डॉ. राजेंद्रप्रसाद हे संविधान सभेचे अध्यक्ष होते. संविधान सभेचे कामकाज त्यांच्या देखरेखीखाली पार पडले. संविधान सभेच्या कामात सुसूत्रता यावी, यासाठी वेगवेगळ्या समित्या तयार करण्यात आल्या होत्या. उदा., राष्ट्रध्वजाविषयीची समिती, मूलभूत हक्कविषयक समिती इत्यादी. या समित्यांनी त्यांच्याकडे सोपवण्यात

आलेल्या विषयांचा सखोल अभ्यास करून अहवाल तयार केले. या अहवालांतील शिफारशी ध्यानात घेऊन संविधानाचा मसुदा तयार करण्यात आला. संविधानाचा मसुदा तयार करण्याचे काम मसुदा समितीकडे सोपवण्यात आले.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान** : मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होते. त्यांचा विविध देशांच्या संविधानांचा गाढा अभ्यास होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अहोरात्र अभ्यास व चिंतन करून संविधानाचा मसुदा तयार केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेला संविधानाचा मसुदा संविधान सभेपुढे मांडण्यात आला. त्यावर कलमवार चर्चा झाली. दुरुस्त्या सुचवण्यात आल्या. संविधानाचा मसुदा संविधान सभेपुढे मांडण्याचे, त्याविषयी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देण्याचे, तसेच संविधान सभेच्या सूचनांनुसार मूळ मसुद्यात फेरबदल करण्याचे महत्त्वाचे कामसुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीच केले. भारतीय संविधानाच्या निर्मितीमधील या योगदानामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना 'भारतीय संविधानाचे शिल्पकार' म्हणतात.

**संविधानाचा स्वीकार** : संविधान सभेने संपूर्ण संविधानाचा स्वीकार २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी केला. संविधानाच्या अंमलबजावणीसाठी २६ जानेवारी, १९५० हा दिवस निश्चित करण्यात आला, कारण 'पूर्ण

स्वराज्या'च्या मागणीसाठी १९३० पासून हा दिवस 'स्वराज्य दिन' म्हणून साजरा केला जात असे. त्या दिवसाची आठवण म्हणून २६ जानेवारी हा दिवस निवडण्यात आला. संविधानातील तरतुदींनुसार राज्यकारभार करण्यास २६ जानेवारी, १९५० पासून सुरुवात झाली. भारत प्रजासत्ताक झाला, त्यामुळे हा दिवस आपण 'प्रजासत्ताक दिन' म्हणून साजरा करतो.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातून पुढे आलेल्या स्वातंत्र्य, समानता, बंधुता, सहिष्णुता, धर्मनिरपेक्षता यांसारख्या मूल्यांचा स्वीकार भारताच्या संविधानाने केला आहे.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.**

(अ) नागरिकांना त्यांच्या हक्कांची हमी .......... तरतुदींद्वारे दिली जाते.
(संविधानातील, नियमावलीतील, कायद्यातील)

(आ) संविधानानुसार राज्यकारभार केल्यास .......... बळकट होते.
(राजेशाही, हुकुमशाही, लोकशाही)

(इ) संविधान सभेने संपूर्ण संविधानाचा स्वीकार ..........रोजी केला आहे.
(२६ जानेवारी, १९५०, २६ नोव्हेंबर, १९४९, २६ जानेवारी, १९३०)

२. **'अ' गट व 'ब' गट यांच्या योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) डॉ. राजेंद्रप्रसाद | (१) मसुदा समितीचे अध्यक्ष |
| (आ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर | (२) संविधान सभेचे अध्यक्ष |
| (इ) बी. एन. राव | (३) मूलभूत हक्कविषयक समितीचे अध्यक्ष |
| | (४) संविधान सभेचे कायदेविषयक सल्लागार |

३. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) संविधान म्हणजे काय?

(आ) भारताच्या संविधान सभेतील दोन स्त्री सदस्यांची नावे लिहा.

(इ) भारतीय संविधानाने कोणती मूल्ये स्वीकारली आहेत?

४. **कारणे द्या.**

(अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणतात.

(आ) २६ जानेवारी हा दिवस आपण 'प्रजासत्ताक दिन' म्हणून साजरा करतो.

**उपक्रम**

संविधान सभेतील काही सदस्यांची चित्रे संग्रहित करून त्यांचा तक्ता वर्गात लावा.

□□□

**संविधान सभेपुढील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भाषणातील काही अंश.**

'..... राजकीय लोकशाहीच्या मुळाशी सामाजिक लोकशाही असल्याशिवाय ती टिकू शकणार नाही. सामाजिक लोकशाही म्हणजे काय? स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता या तत्त्वांना आपल्या आयुष्यात जीवनविषयक तत्त्वे म्हणून मान्यता देणे. स्वातंत्र्य, समानता, बंधुतेच्या या तत्त्वांना मूल्यत्रयीत अलग समजता कामा नये. कारण ती एक एकसंघ त्रयी आहे. म्हणजेच त्याची एकमेकांपासून फारकत करणे लोकशाहीच्या मूळ उद्दिष्टांचाच पराभव करणे ठरेल....'

२५ नोव्हेंबर, १९४९

संविधान सभेतील चर्चा, खंड ११

## २. संविधानाची प्रास्ताविका

भारताचे संविधान कसे तयार झाले, हे आपण मागील पाठात पाहिले. संविधानाच्या मूल्यांची आणि उद्‌दिष्टांची ओळख आपण या पाठात करून घेणार आहोत.

संविधानाच्या प्रस्तावनेला 'प्रास्ताविका' किंवा 'उद्‌देश पत्रिका' म्हणतात. संविधानाच्या प्रास्ताविकेतून संविधानाची मूल्ये व उद्‌दिष्टे स्पष्ट होतात, म्हणून प्रास्ताविका ही संविधानाचा अर्थ समजण्याची गुरुकिल्ली आहे. या पाठ्यपुस्तकाच्या सुरुवातीस संविधानाची प्रास्ताविका दिली आहे.

भारताच्या संविधानाच्या प्रास्ताविकेची सुरुवात 'आम्ही भारताचे लोक' या शब्दांनी होते व शेवट 'हे संविधान .... स्वतः प्रत अर्पण करत आहोत.' या शब्दांनी होतो. यातून हे संविधान भारतीयांनी तयार केलेले आहे हे व्यक्त होते. आपला देश कोणत्याही परकीय नियंत्रणाखाली नाही आणि आपला विकास करण्याचा आपल्याला पूर्ण अधिकार आहे, असा अर्थ या शब्दांमधून स्पष्ट होतो.

### संविधानाची उद्‌दिष्टे


**लोकशाही प्रजासत्ताक** : देशाचा राज्यकारभार लोकांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी करण्याच्या पद्‌धतीला लोकशाही म्हणतात. लोकशाहीचा स्वीकार करून प्रत्येक भारतीय नागरिकाला राज्यकारभारात सहभागी होण्याचा अधिकार संविधानाने दिला आहे. अठरा वर्षे वयावरील सर्व नागरिकांना मतदानाचा अधिकार आहे.

भारतात राष्ट्रपती, पंतप्रधान, उपराष्ट्रपती यांसारख्या पदांसाठी निवडणूक लढवण्याचा अधिकार सर्व भारतीय नागरिकांना आहे. आपल्या देशात या

सर्व पदांवरील व्यक्ती जनतेकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे निवडल्या जातात, म्हणून आपला देश 'प्रजासत्ताक देश' आहे.

**समाजवाद :** समाजवादाचे उद्‌दिष्ट स्वीकारून आर्थिक विषमता व शोषण नष्ट करण्याचे तत्त्व आपण मान्य केले आहे. गरीब व श्रीमंत यांच्यातील दरी कमी करणे, दुर्बल घटकांना संरक्षण देणे ही उद्‌दिष्टे समाजवादातून व्यक्त होतात.

**धर्मनिरपेक्षता :** संविधानाने धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व स्वीकारले आहे. त्यानुसार कोणत्याही विशिष्ट धर्माला राज्याचा धर्म म्हणून मान्यता नाही. देशाच्या कारभारात कोणताही धर्म, संप्रदाय यांचा हस्तक्षेप नसावा, हे संविधानात स्पष्ट केले आहे.



**न्याय** : विषमता दूर करून प्रत्येक व्यक्तीला विकासाची समान संधी देणे म्हणजे न्याय प्रस्थापित करणे होय. सामाजिक न्याय म्हणजे जात, धर्म, वंश, लिंग, संपत्ती आणि सामाजिक स्थान यांवर आधारित भेद न करता, प्रत्येक व्यक्तीचा दर्जा समान मानणे व सत्ता, मान्यता आणि संसाधनामधील तिचा रास्त वाटा तिला प्राप्त होणे. अशा प्रकारच्या सामाजिक न्यायावर आधारलेल्या समाजाची निर्मिती करणे हे संविधानाचे उद्‌दिष्ट आहे.

**स्वातंत्र्य** : भारतीय संविधानाने नागरिकांना विविध प्रकारची स्वातंत्र्ये दिली आहेत. भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संघटना उभारण्याचे स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य, व्यवसाय स्वातंत्र्य, संचार व वास्तव्य स्वातंत्र्य यांसारख्या स्वातंत्र्यांची हमी आपल्या संविधानाने दिली आहे. स्वत:चा आणि समाजाचा विकास करण्याची संधी स्वातंत्र्यामुळे नागरिकांना प्राप्त होते.

**समानता** : भारतीय संविधानाने समानतेचे मूल्य स्वीकारले आहे. धर्म, जात, वंश, लिंग, जन्मस्थान यांसारख्या बाबींच्या आधारे राज्याला व्यक्तींमध्ये भेद करता येत नाही. त्याचबरोबर सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या दुर्बल समाज घटकांसाठी विशेष तरतुदी करण्याचा अधिकार संविधानाने शासनाला दिला आहे.

**बंधुता** : बंधुता म्हणजे कोणताही भेद न करता सर्व लोकांविषयी आदर आणि प्रेमाची भावना असणे. भारतीय नागरिकांनी एकोप्याने राहावे, परस्परांवर विश्वास ठेवावा व देशाचा विकास साधावा असे बंधुतेत अपेक्षित आहे.

ही उद्‌दिष्टे सहजपणे साध्य करता यावीत, म्हणून आवश्यक त्या तरतुदी संविधानात केल्या आहेत. शासनाला त्यासाठी कायदे करण्याचे

अधिकार दिले आहेत. विषमता आणि शोषण नष्ट करून न्यायावर आधारलेल्या समाजाची निर्मिती करण्यास आपले संविधान अतिशय अनुकूल आहे, म्हणून भारतीय संविधानाला 'सामाजिक परिवर्तनाचे साधन' म्हणतात.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) संविधानाच्या प्रस्तावनेला ………. किंवा 'उद्देश पत्रिका' म्हणतात.

(आ) भारतीय संविधानाने ………. चे मूल्ये स्वीकारले आहे.

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) भारताच्या संविधानाच्या प्रास्ताविकेची सुरुवात कोणत्या शब्दांनी होते?

(आ) स्वातंत्र्यामुळे नागरिकांना कोणती संधी प्राप्त होते?

**३. तीन ते चार वाक्यांत माहिती लिहा.**

(अ) धर्मनिरपेक्षता

(आ) समानता

(इ) बंधुता

### उपक्रम

संविधानाच्या प्रास्ताविकेचा तक्ता मोठ्या अक्षरांत तयार करून वर्गात लावा आणि त्याचा अर्थ शिक्षकांकडून समजावून घ्या.

□□□

आपले संविधान आपणच तयार केले आहे. ते आपल्यावर कोणी लादलेले नाही, म्हणूनच आपण संविधानाचे निष्ठेने पालन केले पाहिजे. संविधानाचे पालन हे प्रत्येक भारतीयाचे मूलभूत कर्तव्य आहे.

# ३. नागरिकांचे मूलभूत हक्क आणि कर्तव्ये

प्रत्येक व्यक्तीला आपली प्रगती व्हावी आणि आपल्या गुणांचा विकास व्हावा असे वाटत असते. त्यासाठी आपले मत व्यक्त करण्याचे, मुक्तपणे संचार करण्याचे, व्यवसाय निवडीचे आणि या प्रकारची अन्य स्वातंत्र्ये तिला असणे आवश्यक आहे. व्यक्तीच्या विकासासाठी आवश्यक अटींना हक्क म्हणतात. उदा., शिक्षणामुळे विकासाच्या आणि रोजगाराच्या संधी प्राप्त होतात, म्हणून शिक्षणाच्या संधी देण्याची मागणी करणे व तिला मान्यता मिळणे म्हणजे शिक्षणाचा हक्क प्राप्त करणे होय. साधारणत: संविधानातच अशा हक्कांची नोंद करून नागरिकांचे स्वातंत्र्य सुरक्षित ठेवले जाते. भारताच्या संविधानातील नागरिकांच्या हक्कांचा अभ्यास या पाठात आपण करणार आहोत.

**मूलभूत हक्क** : संविधानात समाविष्ट केलेल्या नागरिकांच्या हक्कांना 'मूलभूत हक्क' म्हणतात. मूलभूत हक्कांचा भंग होईल असे कायदे शासनास करता येत नाहीत. मूलभूत हक्कांना असे संरक्षण असणे नागरिकांसाठी फार महत्त्वाचे असते. भारतीय संविधानाने नागरिकांना सहा प्रकारचे मूलभूत हक्क दिले आहेत.

**१. समानतेचा हक्क** : समानतेच्या हक्कानुसार शासनाला नागरिकांमध्ये धर्म, वंश, जात, लिंग व जन्मस्थान इत्यादी कारणांवरून भेद करता येत नाही. तसेच सर्व भारतीय नागरिक कायद्यापुढे समान असतात आणि सर्वांना कायद्याचे समान संरक्षण असते. सार्वजनिक सोई-सुविधांचा वापर सर्वांना करण्याचा अधिकार आहे. तसेच सर्व भारतीय नागरिकांना सरकारी नोकरीच्या समान संधीची हमी दिली आहे. संविधानाने अस्पृश्यतेच्या प्रथेचे निर्मूलन केले असून, अस्पृश्यतेचे पालन

करणे हा गुन्हा ठरवला आहे. लोकांमध्ये श्रेष्ठ व कनिष्ठ असा भेद दाखवणाऱ्या पदव्या देण्यास संविधानाने बंदी घातली आहे. उदा., राजा, महाराजा, रावबहादूर यांसारख्या पदव्या रद्द केल्या आहेत.

२. **स्वातंत्र्याचा हक्क** : संविधानाने भारतीय नागरिकांना सहा प्रकारच्या स्वातंत्र्याची हमी दिली आहे. ही सहा स्वातंत्र्ये पुढीलप्रमाणे –

(१) **भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य** : भारतीय नागरिकांना विचार करण्याचे आणि आपला विचार विविध माध्यमांतून व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य आहे.

(२) **सभा स्वातंत्र्य** : शस्त्रे न बाळगता शांततेने एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य नागरिकांना आहे. यानुसार नागरिक सभा आयोजित करू शकतात. शांततेने मोर्चा, प्रभातफेरी, निषेध सभा इत्यादींचे आयोजन करू शकतात.

(३) **संघटना स्वातंत्र्य** : समान विचारांचे लोक काही समान उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी एकत्र येतात. त्यांना संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य आहे.

(४) **संचार स्वातंत्र्य** : भारताच्या नागरिकांना देशाच्या कोणत्याही भागात मुक्तपणे वावरण्याचे स्वातंत्र्य आहे.

(५) **वास्तव्य स्वातंत्र्य** : भारताच्या नागरिकांना देशात कुठेही राहण्याचे व कायम वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य आहे.

(६) **व्यवसाय स्वातंत्र्य** : भारतीय नागरिक आपल्याला हवा तो कायदेशीर व्यवसाय करू शकतात.

या सहा स्वातंत्र्यांशिवाय आणखी दोन महत्त्वाची नागरी स्वातंत्र्ये संविधानाने दिली आहेत. त्यानुसार कोणत्याही व्यक्तीला बेकायदेशीरपणे अटक करता येत नाही. तसेच शासन कोणत्याही व्यक्तीचे जीवित व स्वातंत्र्य बेकायदेशीररीत्या हिरावून घेऊ शकत नाही.

ही स्वातंत्र्ये अनिर्बंध नाहीत. देशाची शांतता, सुव्यवस्था, सार्वजनिक आरोग्य, नीतिमत्ता आणि देशहिताला बाधा येणार नाही, याचे भान हे हक्क वापरताना ठेवावे लागते.

२००९ साली सहा ते चौदा वयोगटातील बालकांना प्राथमिक शिक्षण (इयत्ता पहिली ते आठवी) सक्तीचे व मोफत मिळण्यासंबंधीचा कायदा करण्यात आला आहे. या कायद्यामुळे कोणत्याच बालकाला आता शिक्षणापासून वंचित राहावे लागणार नाही.

**३. शोषणाविरुद्धचा हक्क :** प्रत्येकाचे जीवित आणि स्वातंत्र्य सुरक्षित राहावे, यासाठी संविधानाने नागरिकांना शोषणाविरुद्धचा हक्क दिला आहे. त्यानुसार माणसांची खरेदी-विक्री, गुलामगिरी, वेठबिगारी



बालमजुरीवर बंदी

यांवर संविधानाने बंदी घातली आहे. १४ वर्षे वयाखालील मुलामुलींना कारखाने, खाणी किंवा इतर धोकादायक ठिकाणी कामावर ठेवण्यासही बंदी आहे. २००६ साली हा हक्क अधिक व्यापक करत सर्व प्रकारची बालमजुरी हा कायद्याने गुन्हा ठरवण्यात आला आहे.


**४. धर्मस्वातंत्र्याचा हक्क :** आपल्या देशात विविध धर्मांचे आणि पंथांचे लोक राहतात. सर्वांना आपापल्या धर्मानुसार पूजा व उपासना करण्याचा हक्क संविधानाने दिला आहे. सर्व नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्य असले, तरी धर्माच्या नावे चालणाऱ्या अमानुष चालीरीती, प्रथा आणि अंधश्रद्धा यांवर सरकार बंदी घालू शकते.

**५. सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क :** आपल्या देशात विविध धर्म, पंथ आणि भाषा असल्यामुळे भारतात सांस्कृतिक विविधता आहे. सांस्कृतिक परंपराही वेगवेगळ्या आहेत. या सांस्कृतिक परंपरा जपता याव्यात, आपल्या वैशिष्ट्यपूर्ण भाषेचा विकास करता यावा यांसाठी संविधानाने नागरिकांना सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क दिले आहेत. अल्पसंख्य असलेल्या गटांना आपापली भाषा, संस्कृती, परंपरा यांचे रक्षण आणि संवर्धन करण्याचा हक्क आहे. त्यासाठी स्वतंत्र शिक्षणसंस्था स्थापन करण्याचा त्यांना हक्क आहे.

**६. न्यायालयाकडे दाद मागण्याचा हक्क :** संविधानात नमूद केलेल्या नागरिकांच्या हक्कांवर अतिक्रमण झाल्यास किंवा ते हक्क नाकारल्यास नागरिकांना न्यायालयाकडे दाद मागण्याचा हक्क आहे. न्यायालयात दाद मागण्याचा हक्क हा अत्यंत महत्त्वाचा समजला जातो, कारण या हक्कामुळे शासनाला व्यक्तीचे मूलभूत हक्क हिरावून घेता येत नाहीत.

**नागरिकांची मूलभूत कर्तव्ये :** नागरिकांनी लोकशाही प्रक्रियेत सहभागी होऊन आपापल्या जबाबदाऱ्या पार पाडणे आवश्यक असते. नागरिकांना देशाविषयीच्या त्यांच्या जबाबदाऱ्यांची आठवण करून देण्यासाठी १९७६ साली १० मूलभूत कर्तव्यांचा समावेश भारतीय संविधानात करण्यात आला. संविधानाचे पालन करणे, राष्ट्रगीत व राष्ट्रध्वजाचा मान ठेवणे,

देशाचे रक्षण करणे यांसारख्या जबाबदाऱ्यांचा समावेश मूलभूत कर्तव्यांमध्ये आहे.



पर्यावरणाचे जतन व संरक्षण

पर्यावरणाचे संरक्षण करणे, हेदेखील नागरिकांचे मूलभूत कर्तव्य आहे. झाडांची बेसुमार तोड, प्लॅस्टिकचा वापर, नद्या-सरोवरांमध्ये टाकलेला औद्योगिक कचरा, प्रचंड धूर सोडणारी वाहने यांसारख्या गोष्टींमुळे प्रदूषण पसरते व निसर्गाचा समतोल ढासळतो. सण-समारंभांत मोठ्या आवाजात ध्वनिक्षेपक लावणे, विनाकारण वाहनांचे हॉर्न वाजवणे यांमुळे ध्वनीप्रदूषण वाढते. प्रदूषणामुळे पर्यावरणाची हानी तर होतेच, त्याचबरोबर माणसांचे आणि प्राणिमात्रांचे स्वास्थ्यही बिघडते. हवा, पाणी आणि ध्वनीप्रदूषण टाळून पर्यावरणाचे संरक्षण करणे, हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

**हक्क आणि कर्तव्य यांचा समतोल :** प्रत्येक व्यक्तीला जसे हक्क असतात, तशीच कर्तव्येही असतात. हक्क व कर्तव्ये एकमेकांपासून

वेगळी करता येत नाहीत, याचे भान प्रत्येक नागरिकाला असणे आवश्यक आहे. हक्कांमुळे आपला विकास होतो, तर कर्तव्यपालनामुळे समाजजीवन सुरळीत चालते. आपल्या हक्कांचा लाभ घेणे आणि आपली कर्तव्ये पार पाडणे हे प्रत्येक सुजाण नागरिकाचे लक्षण आहे. हक्कांचा उपभोग घेताना आपण कर्तव्यांचेही पालन करण्याबाबत जागरूक असले पाहिजे.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) संविधानात समाविष्ट केलेल्या नागरिकांच्या हक्कांना ........... हक्क म्हणतात.

(आ) भारतीय नागरिक आपल्याला हवा तो कायदेशीर ........... करू शकतात.

(इ) पर्यावरणाचे संरक्षण करणे हेदेखील नागरिकांचे मूलभूत ........... आहे.

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणजे काय?

(आ) संचार स्वातंत्र्य म्हणजे काय?

(इ) १९७६ साली दहा मूलभूत कर्तव्यांचा समावेश भारतीय संविधानात का करण्यात आला?

**३. तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) स्वातंत्र्याचा हक्क वापरताना कोणते भान ठेवावे लागते?

(आ) हक्क आणि कर्तव्य यांचा समतोल का राखला पाहिजे?

**उपक्रम**

(अ) मूलभूत कर्तव्यांचा तक्ता मोठ्या अक्षरांत तयार करून वर्गात लावा.

(आ) तुमच्या वर्गात पर्यावरण मंडळ स्थापन करा. ध्वनीप्रदूषण रोखण्याविषयीच्या उपायांची माहिती मिळवा.

**नागरिकांची मूलभूत कर्तव्ये**

१. प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.
२. स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.
३. देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.
४. आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.
५. सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.
६. आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.
७. नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.
८. वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.
९. सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.
१०. देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.
११. ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात. (या कर्तव्याचा समावेश २००२ साली करण्यात आला.)

**मालमत्तेचा हक्क** : संविधानाने नागरिकांना मालमत्ता मिळवण्याचा, ती बाळगण्याचा मूलभूत हक्क दिला होता; मात्र जमीनदारीसारख्या विषमतेला खतपाणी घालणारी प्रथा नष्ट करण्यात त्यामुळे अडथळा येऊ लागला, म्हणून मालमत्तेच्या हक्कात टप्प्याटप्प्याने बदल करण्यात आला आहे. मालमत्तेचा हक्क हा आता मूलभूत हक्क नाही. असे असले, तरी न्याय्य कारणाशिवाय शासन नागरिकांची मालमत्ता ताब्यात घेऊ शकत नाही. धरणांसाठी, उद्योगधंद्यांसाठी किंवा इतर सार्वजनिक कामांसाठी जर नागरिकांची मालमत्ता शासनाने ताब्यात घेतली, तर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार त्या नागरिकांच्या पुनर्वसनाची जबाबदारी शासनावर असते.

## ४. संविधानातील मार्गदर्शक तत्त्वे

मागील पाठात आपण मूलभूत हक्क आणि कर्तव्यांचा अभ्यास केला. या पाठात आपण संविधानातील राज्याच्या धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांचा अभ्यास करणार आहोत.

समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांना शिक्षण, रोजगार यांसारख्या अनेक बाबी मिळणे आवश्यक असते. समानता आणि न्याय ही उद्दिष्टे साध्य करणे गरजेचे असते. त्यासाठी सरकारने धोरणे आखताना कोणती तत्त्वे आधारभूत मानावी हे संविधानात सांगितले आहे. या तत्त्वांना 'राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे' असे म्हणतात.

ही मार्गदर्शक तत्त्वे संघशासन, घटक राज्यशासन व स्थानिक शासनसंस्थांना लागू होतात. ही तत्त्वे मार्गदर्शनपर आहेत. ती अमलात आणण्यासाठी योग्य ते कार्यक्रम शासनाने आखावेत, अशी अपेक्षा असते. शासन कोणत्याही राजकीय पक्षाचे असले, तरी धोरणे ठरवताना आणि कायदे करताना ही मार्गदर्शक तत्त्वे पाळायची असतात.

ढोबळमानाने या मार्गदर्शक तत्त्वांचे वर्गीकरण दोन गटांत करता येईल.

(१) शासनसंस्थेच्या धोरणांविषयीची मार्गदर्शक तत्त्वे.

(२) नागरिकांच्या हक्कांविषयीची मार्गदर्शक तत्त्वे.

**शासनसंस्थेच्या धोरणांविषयीची मार्गदर्शक तत्त्वे :** शासनाने आपले कार्य केवळ कायदा व सुव्यवस्था राखण्यापुरते मर्यादित ठेवू नये, तर लोकांच्या कल्याणाची जबाबदारी उचलावी, असे मार्गदर्शक तत्त्वांतून स्पष्ट होते. सर्व नागरिकांना सन्मानाने जगता येईल, अशी सामाजिक परिस्थिती शासनाने निर्माण करावी. नागरिकांचे राहणीमान उंचावेल अशी

धोरणे आखावीत. सकस आहाराचा पुरवठा करावा, सार्वजनिक आरोग्य सुधारावे. या तत्त्वांतून शासनाच्या धोरणांना अशा प्रकारचे मार्गदर्शन करण्यात आले आहे.

जागतिक शांतता प्रस्थापित करण्यास भारताने हातभार लावावा व त्यानुसार आपले परराष्ट्रीय धोरण आखावे अशी अपेक्षा मार्गदर्शक तत्त्वांमधून व्यक्त होते.


मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण, दारूबंदी, कुटीरोद्योगांचा विकास, पर्यावरण संरक्षण, ऐतिहासिक वास्तूंचे जतन यांसारख्या उद्दिष्टांचा समावेश या गटात करता येईल.

**नागरिकांच्या हक्कांविषयीची मार्गदर्शक तत्त्वे :** स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लगेच नागरिकांच्या सर्वच सामाजिक व आर्थिक हक्कांची हमी देणे सरकारला शक्य नव्हते, कारण देशाचा आर्थिक विकास व्हायचा होता, त्यामुळे देशाची जसजशी प्रगती होईल, तसतसे नागरिकांचे हक्क शासनाने द्यावे, या हेतूने काही मार्गदर्शक तत्त्वांचा संविधानात समावेश करण्यात आला. अशी मार्गदर्शक तत्त्वे नागरिकांच्या हक्कांविषयीची मार्गदर्शक तत्त्वे म्हणून ओळखली जातात. उदाहरणार्थ, प्रत्येक नागरिकाला रोजगार मिळवण्याचा हक्क; स्त्री व पुरुष दोघांना समान कामासाठी समान वेतन मिळण्याचा हक्क; मोफत कायदेशीर मदत मिळण्याचा हक्क; बेरोजगार, वृद्ध, आजारी व निराधारांना आर्थिक साहाय्य मिळण्याचा हक्क यांसारख्या काही हक्कांचा समावेश या गटात होतो.

शासनाने मार्गदर्शक तत्त्वांनुसार धोरणे आखावीत, अशी अपेक्षा संविधानात व्यक्त केली आहे, परंतु तशी सक्ती नाही. त्यामुळे मार्गदर्शक तत्त्वांची कार्यवाही न झाल्यास नागरिक न्यायालयाकडे दाद मागू शकत नाहीत.

**मार्गदर्शक तत्वांचे यश :** मार्गदर्शक तत्वांच्या आधारे धोरणे आखून कल्याणकारी राज्याची कल्पना प्रत्यक्षात उतरवण्याचे प्रयत्न आपल्या देशात झाले आहेत. त्याची उदाहरणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१. पंचायती राज व्यवस्था :** राज्यकारभारात लोकांचा सहभाग वाढावा व ग्रामीण भागाचा विकास व्हावा, या उद्देशाने पंचायती राज व्यवस्था निर्माण करण्यात आली. ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदांना जास्त अधिकार देण्यात आले आहेत. स्त्रियांसाठी राखीव जागा ठेवल्याने मोठ्या संख्येने स्त्रिया राजकारणात आल्या आहेत आणि ग्रामीण भागाचा विकास करत आहेत.




सहभागातून विकास

**२. पर्यावरणाचे संरक्षण :** पर्यावरणाच्या संरक्षणासाठी शासनाने अनेक उपाययोजना केल्या आहेत. सामाजिक वनीकरण, वन्य पशूंना संरक्षण, पाण्याचे व्यवस्थापन इत्यादींसाठी योजना शासनाने आखल्या आहेत.

**३. महिला व बालकल्याण :** महिलांना स्वास्थ्य व सुरक्षितता मिळावी, म्हणून शासनाने अनेक आरोग्यविषयक उपक्रम राबवले आहेत. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांच्या संरक्षणासाठी कायदा करण्यात आला आहे. तसेच स्त्रियांनी मागणी केल्यास गावातील दारूची दुकाने बंद करता येतात. बालकांचे शोषण थांबावे व त्यांना आनंदी आणि निकोप वातावरणात वाढण्याची संधी मिळावी, म्हणून बालमजुरीवर बंदी घालण्यापासून ते त्यांना मोफत शिक्षण देण्यापर्यंतच्या विविध योजना अस्तित्वात आहेत.

**४. दुर्बल घटकांचा विकास :** समाजातील दुर्बल घटकांचा विकास करण्यासाठी शासनाने अनेक उपाययोजना केल्या आहेत. दुर्बल घटकांतील मुलामुलींना शिक्षणाच्या संधी मिळाव्यात, म्हणून शिष्यवृत्त्या दिल्या जातात. त्यांच्यासाठी मोफत वसतिगृहांची तरतूदही केली जाते. कुटीरोद्योगांच्या विकासासाठी शासन त्यांना अर्थसाहाय्य देते.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) मार्गदर्शक तत्त्वे .......... , घटक राज्यशासन व स्थानिक शासनसंस्थांना लागू होतात.

(आ) शासनाने .......... तत्त्वांनुसार धोरणे आखावी, अशी अपेक्षा संविधानात व्यक्त केली आहे.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) भारताच्या परराष्ट्र धोरणाबाबत मार्गदर्शक तत्त्वांत कोणती अपेक्षा व्यक्त केली आहे?

(आ) समाजातील दुर्बल घटकांना शिष्यवृत्त्या का दिल्या जातात?

३. **तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) नागरिकांच्या हक्कांविषयीच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये कोणत्या हक्कांचा समावेश होतो?


(आ) महिला व बालकल्याणासाठी शासनाच्या कोणत्या योजना अस्तित्वात आहेत?

**उपक्रम**

शासनाने शिक्षणाच्या संदर्भात विविध योजना अमलात आणल्या आहेत. त्यांची माहिती शिक्षकांच्या साहाय्याने मिळवा.

□□□

**महिलांना संरक्षण :** समाजातील दुर्बल घटकांच्या, विशेषत: महिलांच्या कल्याणासाठी शासनाने अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. या संदर्भात संघशासनाच्या कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांना संरक्षण देणाऱ्या कायद्याचा उल्लेख करता येईल. कुटुंबातील व्यक्तींकडून जर स्त्रीचा किंवा तिच्या मुलाबाळांचा मानसिक छळ होत असेल किंवा शारीरिक इजा करण्याचा प्रयत्न होत असेल, तर इ. स. २००६ च्या या कायद्यानुसार महिलांना पोलिसांकडे तक्रार नोंदवता येते व कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण मिळवता येते.



# ५. भारतीय लोकशाही

लोकशाही ही राज्यकारभार करण्याची एक पद्धती आहे. लोकशाहीत सर्वसामान्य लोकांच्या हाती राज्यकारभाराची अंतिम सत्ता असते. सर्व लोकांना राज्यकारभारात एकाच वेळी भाग घेता येत नाही, म्हणून लोक निवडणुकीद्वारे मत देऊन त्यांना योग्य वाटेल असा प्रतिनिधी निवडतात. प्रतिनिधींची निवड पाच वर्षांच्या काळापुरती असते. मुदत संपल्यावर प्रतिनिधींना निवडणुकीस पुन्हा सामोरे जावे लागते. अशा प्रकारे लोकांना आपल्या प्रतिनिधींवर व देशाच्या कारभारावर नियंत्रण ठेवता येते.

**लोकशाहीची वैशिष्ट्ये**

**नियमित निवडणुका :** निःपक्षपाती आणि मोकळ्या वातावरणातील निवडणुका हे भारतीय लोकशाहीचे वैशिष्ट्य आहे. निवडणुका निर्भय वातावरणात पार पाडण्याची जबाबदारी निवडणूक आयोगावर असते. निवडणुकीसाठी उमेदवारांचे अर्ज स्वीकारण्यापासून प्रचारापर्यंत आणि मतदानापासून निकाल घोषित होईपर्यंतच्या सर्व घडामोडींवर निवडणूक आयोगाचे नियंत्रण असते. मतदारांना निर्भयपणे मतदान करता यावे, म्हणून निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांसाठी आणि राजकीय पक्षांसाठी निवडणूक आयोग आचारसंहिता लागू करतो. त्यामुळे निवडणुकीतील गैरप्रकारांना आळा बसतो.

**बहुपक्ष पद्धती :** भारतात अनेक राजकीय पक्ष आहेत. चारपेक्षा अधिक राज्यात सक्रीय असलेल्या राजकीय पक्षांना 'राष्ट्रीय पक्ष' म्हणतात. काही राजकीय पक्ष विशिष्ट राज्यांपुरतेच मर्यादित आहेत. त्यांना 'राज्यस्तरीय पक्ष' किंवा 'प्रादेशिक पक्ष' म्हणतात. नागरिक यापैकी कोणत्याही पक्षातर्फे निवडणूक लढवू शकतात. कोणत्याही राजकीय पक्षात सहभागी व्हायचे नसेल, तर 'अपक्ष'

म्हणूनही निवडणूक लढवू शकतात. जबाबदार पक्ष पद्धती हे निकोप लोकशाहीचे लक्षण आहे.

**सत्तेचे विकेंद्रीकरण :** अधिकाधिक लोकांना राज्यकारभारात सहभागी होता यावे, म्हणून लोकशाहीत सत्तेचे विकेंद्रीकरण करणे आवश्यक असते. भारतात सत्तेचे वाटप तीन पातळ्यांवर केलेले आहे. संघशासन संपूर्ण देशासाठी कायदे करते. राज्यशासन आपल्या राज्यापुरता कारभार करते. स्थानिक शासन स्थानिक लोकांना सेवा पुरवते. भारतात सत्तेच्या विकेंद्रीकरणामुळे राज्यकारभारात सामान्य जनतेचा सहभाग वाढला आहे.

**जनसंघटनांचा सहभाग :** लोकशाही मूल्यांची जोपासना करणाऱ्या जनसंघटनांचे जाळे हे भारतीय लोकशाहीचे आणखी एक वैशिष्ट्ये आहे. महिलांचे सबलीकरण, पर्यावरण संरक्षण आणि मानवी हक्क, श्रमिकांचे अधिकार इत्यादी क्षेत्रांत कार्य करणाऱ्या विविध जनसंघटना निर्माण झाल्या आहेत. तसेच आरोग्य, शिक्षण, दुर्बल घटकांचा विकास इत्यादी क्षेत्रांत अनेक स्वयंसेवी संस्था कार्य करतात. या संस्था व संघटनांमुळे भारतीय लोकशाही निकोप होण्यास चालना मिळाली आहे.

**प्रसार माध्यमांचे स्वातंत्र्य :** भारतात नागरिकांना विचार करण्याचे आणि आपले मत व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य आहे. वृत्तपत्रे आणि प्रसार माध्यमे स्वतंत्रपणे विचार मांडू शकतात. निर्भयपणे बातम्या प्रसिद्ध करू शकतात. शासनाच्या धोरणांवर परखडपणे चर्चा करू शकतात. लोकशाहीत प्रसार माध्यमांना महत्त्वाची भूमिका असते. भारतातील प्रसार माध्यमांनी लोकांपर्यंत माहिती पोचवण्याचे आणि जनमत घडवण्याचे काम केले आहे. भारतातील लोकशाही बळकट करण्यात वृत्तपत्रे व प्रसार माध्यमांचा मोठा वाटा आहे.

**आर्थिक विकास :** लोकशाही टिकवण्यासाठी देशाचा आर्थिक विकास होणे अतिशय आवश्यक असते. बेरोजगारी दूर करणे, सर्वांना उपजीविकेचे साधन मिळवण्याची संधी असणे, शोषण, कुपोषण, उपासमार आणि भूक यांपासून लोकांना संरक्षण मिळणे इत्यादी बाबी आर्थिक विकासात गृहीत धरल्या जातात. ही उद्‌दिष्टे साध्य करण्यासाठी भारतात नियोजनाचा मार्ग स्वीकारण्यात आला. त्यानुसार आतापर्यंत ११ पंचवार्षिक योजना राबवल्या आहेत.

या सर्व घटकांमुळे भारतात लोकशाही रुजण्यात आणि वाढण्यात मदत झाली. परंतु भारतीय लोकशाहीपुढे काही आव्हानेही उभी आहेत. त्यांपैकी काही आव्हानांची चर्चा आपण येथे करणार आहोत.


## भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने

**१. सांप्रदायिकता :** राजकीय फायद्यासाठी धर्माचा गैरवापर करण्याला सांप्रदायिकता म्हणतात. सांप्रदायिकतेमुळे एकोप्याने राहणाऱ्या लोकांमध्ये तेढ निर्माण होते. आपल्यातील ऐक्य कायम राहावे म्हणून संविधानाने धर्मनिरपेक्षतेचा स्वीकार केला आहे. आपणही इतर धर्मांविषयी सहिष्णुता बाळगायला हवी.

**२. दहशतवाद :** आपली राजकीय उद्‌दिष्टे प्राप्त करण्यासाठी जेव्हा हिंसेचा वापर केला जातो, तेव्हा दहशतवाद निर्माण होतो. दहशतवादी कृत्यांमुळे निरपराध लोकांचा बळी जातो. सार्वजनिक मालमत्तेचा नाश होतो. आर्थिक नुकसान होते. जनजीवन विस्कळीत होते. घबराटीचे वातावरण निर्माण होते. त्यामुळे सामान्य माणसाचे जगणे असुरक्षित होते. अशा प्रकारच्या दहशतवादावर नियंत्रण मिळवणे, हे भारतीय लोकशाहीपुढील मोठे आव्हान आहे.

**३. प्रादेशिकता :** आपल्या प्रदेशापुरताच विचार करण्याच्या संकुचित

वृत्तीला प्रादेशिकता म्हणतात. भाषांच्या आधारे भारतात घटक राज्यांची स्थापना करण्यात आली आहे. आपली भाषा आणि आपले राज्य आपल्याला प्रिय असले, तरी सर्वप्रथम आपण भारतीय आहोत हे विसरता कामा नये. संकुचित वृत्ती सोडून आपण व्यापक भारतीयत्वाचा स्वीकार केला पाहिजे.




**४. भ्रष्टाचार :** भ्रष्टाचार हे भारतीय लोकशाहीपुढील सर्वांत मोठे आव्हान आहे. आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडण्याऐवजी आपल्या पदाचा, अधिकाराचा स्वार्थासाठी गैरवापर करणे यांमुळे भ्रष्टाचार वाढतो.

वाढत्या भ्रष्टाचारामुळे गुन्हेगारी प्रवृत्तींना प्रोत्साहन मिळते व हळूहळू त्यांचा राजकारणात प्रवेश होऊ लागतो. स्वत: भ्रष्टाचार करणे, दुसऱ्याने केलेल्या भ्रष्टाचाराला विरोध न करणे, त्याकडे दुर्लक्ष करणे हा एक सामाजिक अपराध आहे. भ्रष्टाचाराचा बिमोड करणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य आहे. भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी भ्रष्टाचार विरोधी कायदा व विविध यंत्रणा निर्माण करण्यात आल्या आहेत. तसेच भ्रष्टाचार विरोधी आंदोलनेही होत आहेत. भ्रष्टाचार रोखण्यासाठी नागरिकांना माहितीचा अधिकार देण्यात आला आहे.

या आव्हानांना समर्थपणे तोंड देण्यातूनच लोकशाहीचे अधिकाधिक फायदे सर्वसामान्यांना मिळतील.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) चारपेक्षा अधिक राज्यात सक्रीय असलेल्या राजकीय पक्षांना ............ पक्ष म्हणतात.

(आ) निवडणुका निर्भय वातावरणात पार पाडण्याची जबाबदारी ............ आयोगावर असते.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) भारतातील प्रसार माध्यमांनी कोणते काम केले आहे?

(आ) लोकशाहीत सत्तेचे विकेंद्रीकरण करणे आवश्यक का असते?

३. **तीन ते चार वाक्यांत माहिती लिहा.**

(अ) सांप्रदायिकता

(आ) दहशतवाद

(इ) भ्रष्टाचार

**उपक्रम**

(अ) 'वृत्तपत्रे व प्रसार माध्यमे यांचे महत्त्व' या विषयावर शिक्षकांच्या मदतीने वर्गात चर्चासत्र आयोजित करा.

(आ) भारतातील विविध राष्ट्रीय पक्षांची माहिती मिळवा.

□□□

**दहशतवाद – नागरिकांची भूमिका :** दहशतवादाचा नायनाट करण्यात नागरिक महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. दहशतवादी कारवायांची पोलीस यंत्रणेला माहिती देणे, सतत जागरूक व दक्ष राहणे अतिशय गरजेचे आहे. त्याचबरोबर आपल्या मागण्या शासनापुढे ठेवताना हिंसेचा वापर न करणे, हिंसाचार करणाऱ्यांना पाठिंबा न देणे आणि शांततामय व संसदीय मार्गांचा स्वीकार करणे यांतूनच भारतीय लोकशाही दहशतवादाचा मुकाबला करू शकेल.



## ६. संघशासन - कायदेमंडळ

मागील पाठात आपण भारतीय लोकशाहीची वैशिष्ट्ये व लोकशाहीसमोरील आव्हाने याची माहिती घेतली. या पाठात आपण संघशासनाच्या कायदेमंडळाविषयी माहिती घेणार आहोत.

**भारतीय संघराज्याचे स्वरूप :** भारतात संघराज्य पद्धती आहे. याचा अर्थ आपल्या देशात दोन पातळ्यांवर शासनसंस्था काम करतात. संपूर्ण देशासाठी कायदे करणाऱ्या शासनाला आपण 'संघशासन' म्हणतो व आपल्या घटक राज्यापुरते कायदे करणाऱ्या शासनाला 'घटक राज्यशासन' म्हणतो.

मोठा भूप्रदेश आणि सामाजिक विविधता असलेल्या भारतासारख्या देशाला संघराज्य पद्धती उपयुक्त आहे. संघराज्यात संघशासन व राज्यशासन यांच्यात राज्यकारभाराची जबाबदारी विभागली जाते. त्यामुळे दोन्ही शासनांना कार्यक्षमतेने कारभार करता येतो. दोन पातळ्यांवर शासनसंस्था असल्याने राज्यकारभारात अधिक लोक सहभागी होऊ शकतात. एकतेबरोबर विविधताही जपता येते.

भारताच्या संघराज्यात अठ्ठावीस घटक राज्ये व सात संघशासित प्रदेश आहेत. लहानमोठ्या सर्वच राज्यांना संविधानाने समान दर्जा दिला आहे. तथापि जम्मू व काश्मीर या राज्यासाठी मात्र काही विशेष तरतुदी संविधानात आहेत.

**संघशासन व राज्यशासनातील अधिकारांची विभागणी :** संपूर्ण देशाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या संरक्षण, परराष्ट्र संबंध, चलन व्यवस्था यांसारख्या विषयांवर कायदे करण्याचा अधिकार संघशासनाला

आहे. संघशासनाच्या अधिकारांविषयीच्या सूचीला संघसूची म्हणतात. घटक राज्यांच्या अधिकारांची नोंद राज्यसूचीत आहे. यात कायदा आणि सुव्यवस्था, शिक्षण, शेती यांसारख्या विषयांचा समावेश आहे. या व्यतिरिक्त संघशासन आणि राज्यशासन या दोन्हींना कायदे करता येतील अशा विषयांचा समावेश समवर्ती सूचीत केला आहे.

**संघशासनाची रचना** : संघशासनाचे तीन घटक आहेत. (१) कायदे मंडळ (२) कार्यकारी मंडळ (३) न्याय मंडळ.

**संघशासन**

↓

| कायदेमंडळ | कार्यकारी मंडळ | न्यायमंडळ |
|---|---|---|
| संसद<br>↓ ↓ ↓<br>राष्ट्रपती, राज्यसभा, लोकसभा | राष्ट्रपती<br>↓<br>पंतप्रधान व मंत्रिमंडळ | सर्वोच्च न्यायालय |

**कायदेमंडळ** : संघशासनाच्या कायदेमंडळास 'संसद' म्हणतात. संसदेत राष्ट्रपती व दोन सभागृहांचा समावेश होतो. संसदेच्या प्रथम सभागृहास 'लोकसभा' असे म्हणतात, तर द्‌वितीय सभागृहास 'राज्यसभा' असे म्हणतात. संसदेच्या सदस्यांना खासदार म्हणतात.

**लोकसभा**

**रचना** : लोकसभा हे देशातील लोकांचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह आहे. लोकसभेची सदस्य संख्या जास्तीत जास्त ५५० असते. आपल्या देशातील सर्व समाजघटकांना प्रतिनिधित्व मिळावे, म्हणून अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठी आरक्षण देण्यात आले आहे. तसेच

अँग्लो इंडियन समाजास पुरेसे प्रतिनिधित्व नसल्यास त्या समाजाच्या दोन प्रतिनिधींची नेमणूक राष्ट्रपती लोकसभेवर करू शकतात. असे झाल्यास लोकसभेची कमाल सदस्य संख्या ५५२ असू शकते.



संसद भवन

**कार्यकाल व पात्रता :** लोकसभेचा कार्यकाल पाच वर्षांचा असतो. वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या नागरिकांकडून गुप्त मतदान पद्धतीने लोकसभा सदस्यांची प्रत्यक्षपणे निवड होते.

लोकसभेत निवडून येण्यासाठी निवडणूक लढवणारी व्यक्ती भारताची नागरिक असली पाहिजे. तिचे वय २५ वर्षे पूर्ण असले पाहिजे.

**लोकसभा अध्यक्ष :** लोकसभेचे निर्वाचित सदस्य आपल्यातील एका सदस्याची अध्यक्ष म्हणून निवड करतात. लोकसभेचे कामकाज लोकसभा अध्यक्षांच्या देखरेखीखाली चालते. सभागृहातील चर्चा आणि प्रश्नोत्तरे नियमानुसार चालवणे हे लोकसभा अध्यक्षांचे काम असते.

**लोकसभेचे अधिकार व कामे :** लोकांचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह म्हणून लोकसभेला पुढील महत्त्वाची कामे पार पाडावी लागतात.

१. **कायदेविषयक कामे :** सार्वजनिक हित विचारात घेऊन नवे कायदे करणे, हे लोकसभेचे सर्वांत महत्त्वाचे काम होय. नव्या कायद्याच्या प्रस्तावाला विधेयक म्हणतात. विधेयकावर लोकसभेत सर्व सदस्य चर्चा करतात. तसेच ते बहुमताने मंजूर किंवा नामंजूर करतात. लोकसभेला संविधानात दुरुस्ती करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे घटना दुरुस्ती विधेयक लोकसभेत मांडता येते.

२. **आर्थिक कामे :** देशाच्या आर्थिक व्यवहारांवर लोकसभेचे नियंत्रण असते. अर्थ विधेयक प्रथम लोकसभेतच मांडले जाते. लोकसभेने संमती दिल्याशिवाय शासनाला कोणत्याही बाबींवर खर्च करता येत नाही. शासन आपल्या खर्चाचे वार्षिक अंदाजपत्रक तयार करते. या अंदाजपत्रकाला लोकसभेची मंजुरी आवश्यक असते.

३. **मंत्रिमंडळावर नियंत्रण :** मंत्रिमंडळ लोकसभेला जबाबदार असते. लोकसभेचा विश्वास असेपर्यंतच मंत्रिमंडळ सत्तेवर राहू शकते. लोकसभेने बहुमताने मंत्रिमंडळाविरुद्ध अविश्वासाचा ठराव मंजूर केला, तर मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो. लोकसभा सदस्यांनी मंत्र्यांना विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे द्यावी लागतात.

**राज्यसभा**

**रचना :** संसदेच्या द्वितीय सभागृहास राज्यसभा म्हणतात. राज्यसभा घटक राज्यांचे प्रतिनिधित्व करते. राज्यसभेची सदस्य संख्या २५० आहे. त्यांपैकी २३८ सभासद घटक राज्यांचे आणि संघशासित प्रदेशांचे प्रतिनिधी असतात. घटक राज्ये आपल्या लोकसंख्येच्या प्रमाणानुसार राज्यसभेत सदस्य निवडून देतात. कला, विज्ञान, साहित्य, समाजसेवा इत्यादी क्षेत्रांतील १२ तज्ज्ञ सदस्यांची नेमणूक राष्ट्रपती करतात.

**कार्यकाल व पात्रता :** राज्यसभा हे स्थायी सभागृह आहे. ते कधीही बरखास्त होत नाही. राज्यसभेचे एकतृतीयांश सदस्य दर दोन वर्षांनी निवृत्त होतात. त्यांच्या जागी तेवढेच नवे सदस्य निवडले जातात. या पद्धतीने राज्यसभेच्या प्रत्येक सदस्याला सहा वर्षे कार्यकाल मिळतो.

राज्यसभेची निवडणूक लढवणारी व्यक्ती भारतीय नागरिक असली पाहिजे. तिचे वय ३० वर्षे पूर्ण असले पाहिजे.

राज्यसभेचे कामकाज सभापतींच्या नियंत्रणाखाली चालते. भारताचे उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिद्ध सभापती असतात.

**राज्यसभेची कामे :** लोकसभेप्रमाणेच राज्यसभेला कायद्याच्या प्रस्तावावर चर्चा करण्याचा तसेच विधेयक मांडण्याचा अधिकार असतो. विधेयकाचे कायद्यात रूपांतर होण्यासाठी लोकसभेप्रमाणे राज्यसभेची मंजुरी आवश्यक असते. राज्यसभेचे सदस्य मंत्र्यांना प्रश्न विचारू शकतात. त्यांच्या धोरणांवर टीका करू शकतात. राज्यसभेचे सदस्य प्रत्यक्ष जनतेकडून निवडले जात नाहीत, म्हणून अर्थविधेयक राज्यसभेत प्रथम मांडता येत नाही. लोकसभेप्रमाणेच राज्यसभेलाही घटना दुरुस्तीचा अधिकार आहे. राज्यसभेमुळे घटक राज्यांना राष्ट्रीय पातळीवर प्रतिनिधित्व मिळते. त्यामुळे घटक राज्ये आपल्या समान हितसंबंधांची जोपासना करू शकतात.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.**

(अ) संघशासनाच्या अधिकारांविषयीच्या सूचीला ........... म्हणतात.
(राज्यसूची, संघसूची, समवर्ती सूची)

(आ) लोकसभेचा कार्यकाल ........... वर्षांचा असतो.
(पाच, दहा, पंधरा)

(इ) संसदेच्या द्‌वितीय सभागृहास ………… म्हणतात.

(लोकसभा, विधानसभा, राज्यसभा)

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) संघशासनाला कोणत्या विषयांवर कायदे करण्याचा अधिकार आहे?

(आ) राज्यसूचीत कोणत्या विषयांचा समावेश आहे?

(इ) राज्यसभेचे पदसिद्‌ध सभापती कोण असतात?

३. **चार ते पाच वाक्यांत माहिती लिहा.**

(अ) लोकसभेची कामे

(आ) राज्यसभेची कामे

**उपक्रम**

शाळेत शिक्षकांच्या मदतीने अभिरूप संसदेचे आयोजन करा.

□□□

**लोकप्रतिनिधींच्या पात्रतेच्या अटी** : योग्य व लायक व्यक्तीच निवडणुकीस उभ्या राहाव्यात, म्हणून पात्रतेच्या अटी स्पष्ट कराव्या लागतात. पात्रतेच्या अटी ठरवण्याचा अधिकार संविधानाने संसदेला दिला आहे. त्यानुसार संसदेने 'लोकप्रतिनिधित्वाचा कायदा १९५०, १९५१' केला. या कायद्यात वेळोवेळी बदल करून नव्या अटींचा समावेश केला आहे. त्या अटी त्या वेळच्या उमेदवारांनी पूर्ण करणे आवश्यक असते. अलीकडच्या बदलानुसार न्यायालयाने दोषी ठरवून दोन वर्षांपेक्षा अधिक शिक्षा दिलेल्या व्यक्तींना निवडणूक लढवता येत नाही.

## ७. संघशासन – कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ

मागील पाठात आपण संघशासनाच्या कायदेमंडळाविषयी माहिती मिळवली. या पाठात आपण संघशासनाचे कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ यांविषयी माहिती घेणार आहोत. संघशासनाच्या कार्यकारी मंडळात राष्ट्रपती, पंतप्रधान व मंत्रिमंडळाचा समावेश होतो.

**राष्ट्रपती :** राष्ट्रपती हे भारतीय संघराज्याचे प्रमुख असतात. देशाचा कारभार राष्ट्रपतींच्या नावाने चालतो. संविधानानुसार राज्यकारभार चालतो आहे की नाही हे पाहण्याची जबाबदारी राष्ट्रपतींवर असते. पदग्रहण करताना संविधानाचे संरक्षण करण्याची शपथ राष्ट्रपती घेतात.

राष्ट्रपती हे अप्रत्यक्षपणे निवडले जातात. लोकसभा, राज्यसभा आणि सर्व घटक राज्यांतील विधानसभा सदस्य राष्ट्रपतींची निवड करतात.

**कार्यकाल व पात्रता :** राष्ट्रपती पदाचा कार्यकाल पाच वर्षांचा असतो. राष्ट्रपती पदासाठी निवडणूक लढवणारी व्यक्ती ही भारताची नागरिक असावी. तिने वयाची ३५ वर्षे पूर्ण केलेली असावी. राष्ट्रपतींच्या हातून संविधानाचा भंग झाल्यास त्यांना पदावरून दूर करण्याचा अधिकार संसदेला आहे.

**राष्ट्रपतींचे अधिकार व कामे :** पंतप्रधान व केंद्रीय मंत्रिमंडळाची नेमणूक राष्ट्रपती करतात. त्यांच्या सल्ल्याने इतर महत्त्वाच्या पदांसाठी नेमणुकाही राष्ट्रपतीच करतात. उदाहरणार्थ, राज्यपाल, सर्वोच्च व उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, राजदूत, तिन्ही सेनादलांचे प्रमुख, मुख्य निवडणूक आयुक्त, वित्त आयोगाचे अध्यक्ष इत्यादींच्या नेमणुका राष्ट्रपती करतात. राष्ट्रपती तिन्ही सेनादलांचे सरसेनापती असतात.

संसदेने संमत केलेल्या विधेयकांना राष्ट्रपतींची संमती आवश्यक असते. राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीनंतर विधेयकाचे कायद्यात रूपांतर होते.

संसदेचे अधिवेशन चालू नसताना तातडीने कायदा करण्याची गरज भासल्यास राष्ट्रपती वटहुकूम काढू शकतात. हा वटहुकूम कायद्यासारखाच असतो. या अधिकारांबरोबरच राष्ट्रपतींना आणीबाणीच्या प्रसंगी वापरण्यासाठी काही खास काही अधिकार असतात. या अधिकारांना आणीबाणीविषयीचे अधिकार म्हणतात.

राष्ट्रपतींच्या अनुपस्थितीत त्यांची कामे उपराष्ट्रपती पार पाडतात. उपराष्ट्रपतींची निवड संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या सदस्यांकडून होते.

**पंतप्रधान :** देशाच्या राज्यकारभाराची खरी सूत्रे पंतप्रधान व मंत्रिमंडळाकडे असतात. लोकसभेत ज्या पक्षाला बहुमत मिळते, त्या पक्षाच्या नेत्याची पंतप्रधानपदी नेमणूक राष्ट्रपतींकडून केली जाते.

**पंतप्रधानांचे अधिकार व कामे :** पंतप्रधान मंत्रिमंडळाचे प्रमुख असतात. मंत्रिमंडळातील मंत्र्यांची निवड करणे, त्यांच्यात विविध खात्यांचे वाटप करणे, सर्व खात्यांच्या कामात समन्वय साधणे इत्यादी कामे पंतप्रधान पार पाडतात. मंत्रिमंडळाच्या बैठका पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली होतात. मंत्रिमंडळाची धोरणे व कायद्याचे नवे प्रस्ताव यांविषयीची माहिती राष्ट्रपतींना देण्याची जबाबदारी पंतप्रधानांवर असते. देशाचे परराष्ट्र धोरण ठरवण्यात पंतप्रधान महत्त्वाची भूमिका बजावतात.

**मंत्रिमंडळाची कामे :** देशापुढील विविध समस्यांच्या निवारणासाठी धोरणे आणि कार्यक्रम आखणे, वार्षिक अंदाजपत्रक तयार करणे, परराष्ट्रांशी राजकीय, लष्करी, व्यापारी, सांस्कृतिक संबंध प्रस्थापित करणे, कायदेनिर्मितीचे नवे प्रस्ताव तयार करणे व त्यांना संसदेपुढे मांडणे इत्यादी कामे मंत्रिमंडळाला करावी लागतात. मंत्रिमंडळाचे निर्णय सर्व मंत्र्यांवर

बंधनकारक असतात. याला 'सामूहिक जबाबदारीचे तत्त्व' असे म्हणतात. पंतप्रधानांचा राजीनामा हा सर्व मंत्रिमंडळाचा राजीनामा मानला जातो.

**न्यायमंडळ :** भारतातील सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय आणि दुय्यम न्यायालये ही एकमेकांशी साखळी पद्धतीने जोडलेली आहेत, म्हणून भारतातील न्यायव्यवस्थेला एकात्म न्यायव्यवस्था म्हणतात. या न्यायव्यवस्थेच्या शिरोभागी सर्वोच्च न्यायालय आहे. ते नवी दिल्ली येथे आहे. सर्वोच्च न्यायालयात एक सरन्यायाधीश व पंचवीस इतर न्यायाधीश असतात. त्यांची नेमणूक राष्ट्रपती करतात.

**सर्वोच्च न्यायालयाची कामे :** संविधानातील मूलभूत हक्कांच्या संरक्षणाची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयावर असते. मूलभूत हक्क नाकारले गेल्यास नागरिकांना थेट सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येते.



सर्वोच्च न्यायालय - दिल्ली

भारताच्या संघराज्यात विविध घटक राज्यांचे परस्परांशी वाद झाल्यास ते सोडवण्याचे काम सर्वोच्च न्यायालय करते. तसेच संघशासन व घटक

राज्ये यांच्यातील तंटेही सर्वोच्च न्यायालय सोडवते.

संसदेने केलेले कायदे संविधानातील तरतुदींशी विसंगत असल्यास असे कायदे सर्वोच्च न्यायालय घटनाबाह्य ठरवून रद्द करू शकते. अशा प्रकारे सर्वोच्च न्यायालय संविधानाचे संरक्षण करते.

कनिष्ठ न्यायालयाने दिलेला निर्णय जर नागरिकांना अमान्य असेल, तर त्यांना सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागता येते. कनिष्ठ न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा पुनर्विचार सर्वोच्च न्यायालय करू शकते.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) राष्ट्रपतींच्या अनुपस्थितीत त्यांची कामे ………… पार पाडतात.

(आ) पंतप्रधान ………… चे प्रमुख असतात.

(इ) न्यायव्यवस्थेच्या शिरोभागी………… न्यायालय आहे.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) राष्ट्रपतींची निवड कोण करते?

(आ) संसदेने संमत केलेल्या विधेयकांचे कायद्यात रूपांतर केव्हा होते?

(इ) पंतप्रधानपदी कोणत्या पक्षाच्या नेत्याची निवड केली जाते?

३. **दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) पंतप्रधानांची कामे कोणती आहेत?

(आ) मंत्रिमंडळाला कोणती कामे करावी लागतात?

(इ) सर्वोच्च न्यायालय संविधानाचे संरक्षण कोणत्या प्रकारे करते?

### उपक्रम

आपल्या देशाच्या राष्ट्रपतींच्या व पंतप्रधानांच्या छायाचित्रांचा संग्रह करा व त्या चित्रांखाली त्यांची थोडक्यात माहिती लिहा.

# ८. घटक राज्यशासन

मागील पाठात आपण संघशासनाचे कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ यांविषयी माहिती घेतली. या पाठात आपण घटक राज्यपातळीवर राज्यकारभार करणाऱ्या राज्यशासनाचे स्वरूप समजावून घेणार आहोत.

भारतीय संघराज्यातील सर्वच घटक राज्यांच्या शासनयंत्रणेचे स्वरूप साधारणत: सारखेच आहे. आपण महाराष्ट्रातील शासनाचे उदाहरण घेऊन ते समजावून घेणार आहोत. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली.

राज्यपाल, राज्याचे विधिमंडळ आणि राज्याचे मंत्रिमंडळ हे राज्यशासनाचे घटक आहेत. घटक राज्यांच्या विधिमंडळात विधानसभा आणि काही राज्यात विधान परिषद अशी सभागृहे आहेत.

**महाराष्ट्र राज्य विधिमंडळ :** महाराष्ट्राचे विधिमंडळ विधानसभा आणि विधानपरिषद या दोन सभागृहांचे मिळून बनले आहे. विधिमंडळाच्या सदस्यांना आमदार म्हणतात.

## विधानसभा

**रचना :** महाराष्ट्राच्या विधानसभेत एकूण २८८ सभासद आहेत. अँग्लो इंडियन समाजास पुरेसे प्रतिनिधित्व नसेल, तर राज्यपाल त्या समाजाचा एक प्रतिनिधी विधानसभेवर नेमतात. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी काही जागा राखीव असतात.

**कार्यकाल व पात्रता :** विधानसभेचा कार्यकाल पाच वर्षांचा असतो. वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या नागरिकांकडून गुप्त मतदान पद्धतीने विधानसभा सदस्यांची प्रत्यक्षपणे निवड होते. वयाची २५ वर्षे पूर्ण केलेल्या कोणत्याही भारतीय नागरिकास विधानसभेची निवडणूक लढवता येते.



विधान भवन – मुंबई

**अध्यक्ष :** विधानसभेतील सदस्य आपल्यापैकी एका सदस्याची अध्यक्ष व एकाची उपाध्यक्ष म्हणून निवड करतात. विधानसभेचे कामकाज विधानसभा अध्यक्षांच्या नियंत्रणाखाली चालते. त्यांच्या अनुपस्थितीत ही जबाबदारी उपाध्यक्ष पार पाडतात.

महाराष्ट्र विधिमंडळाची वर्षातून कमीत कमी तीन अधिवेशने होतात. हिवाळी अधिवेशन नागपूर येथे होते, तर पावसाळी व अर्थसंकल्पाविषयीचे अधिवेशन मुंबई येथे होते.

**विधानसभेची कामे :** राज्यसूची व समवर्ती सूचीत दिलेल्या विषयांवर कायदे करणे, राज्यशासनाच्या आर्थिक व्यवहारावर नियंत्रण ठेवणे, वार्षिक अंदाजपत्रकाला मंजुरी देणे व राज्य मंत्रिमंडळाच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे इत्यादी कामे विधानसभा पार पाडते.

मंत्रिमंडळाला प्रश्न विचारण्याचा, तसेच शासनाच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार विधानसभेला असतो. विधानसभेचा पाठिंबा असेपर्यंतच मंत्रिमंडळ अधिकारावर राहू शकते.

**विधानपरिषद**

**रचना :** महाराष्ट्राच्या विधानपरिषदेत एकूण ७८ सदस्य आहेत. राज्यातील स्थानिक शासनसंस्था, शिक्षक आणि पदवीधर यांचे प्रतिनिधी विधानपरिषदेत असतात. विधानपरिषदेतील काही सभासद विधानसभेने निवडलेले असतात. कला, साहित्य, विज्ञान, समाजसेवा या क्षेत्रांतील तज्ज्ञ व्यक्तींची विधानपरिषदेवर राज्यपाल नेमणूक करतात.

**कार्यकाल व पात्रता :** विधानपरिषद हे स्थायी सभागृह आहे. एकतृतीयांश सभासद दर दोन वर्षांनी निवृत्त होतात आणि तेवढेच सदस्य पुन्हा निवडले जातात. विधानपरिषदेच्या प्रत्येक सभासदाला सहा वर्षांचा कार्यकाल मिळतो.

विधानपरिषदेची निवडणूक लढवणारी व्यक्ती भारताची नागरिक असावी. तिचे वय ३० वर्षे पूर्ण असावे.

**सभापती :** विधानपरिषदेचे सदस्य आपल्यातून सभापती व उपसभापती निवडतात. सभापतींच्या देखरेखीखाली विधानपरिषदेचे कामकाज चालते. त्यांच्या अनुपस्थितीत उपसभापती ही जबाबदारी पार पाडतात.

**विधानपरिषदेची कामे :** मंत्रिमंडळाच्या कामकाजावर देखरेख ठेवणे, मंत्र्यांना प्रश्न विचारणे तसेच विविध विषयांवर चर्चा करणे इत्यादी कामे विधानपरिषद पार पाडते. विधानसभेप्रमाणेच सर्वसाधारण विधेयके विधानपरिषदेत" प्रथम मांडता येतात. मात्र कोणतेही अर्थविषयक विधेयक विधानपरिषदेत प्रथम मांडता येत नाही. विधेयकांवर चर्चा करण्याचा तसेच दुरुस्त्या सुचवण्याचा

अधिकार विधानपरिषदेला आहे. सर्वच विधेयके मंजूर करण्याचा अंतिम अधिकार मात्र विधानसभेला असतो.

**महाराष्ट्र राज्याचे कार्यकारी मंडळ :** महाराष्ट्र राज्याच्या कार्यकारी मंडळात राज्यपाल, मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाचा समावेश होतो.

**राज्यपाल :** राज्यपाल हे राज्याचे प्रमुख असतात. राज्यपालांची नेमणूक राष्ट्रपती करतात. राज्यपाल पदासाठी संबंधित व्यक्ती भारताची नागरिक असली पाहिजे व तिचे वय ३५ वर्षे पूर्ण असले पाहिजे. कोणत्याही व्यक्तीची तिच्याच राज्यात राज्यपाल म्हणून नेमणूक न करण्याचा प्रघात आहे. उदाहरणार्थ, महाराष्ट्रातील व्यक्ती महाराष्ट्राच्या राज्यपालपदी नेमली जात नाही.

**राज्यपालांचे अधिकार व कामे :** संविधानाने राज्यपालांना अनेक अधिकार दिलेले आहेत. त्यांचा वापर ते मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार करतात.

विधानसभेत ज्या पक्षाला बहुमत मिळते तो पक्ष आपला नेता निवडतो. राज्यपाल त्या नेत्याची नेमणूक मुख्यमंत्रीपदी करतात. मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्यानुसार मंत्रिमंडळातील इतर मंत्र्यांची नेमणूक राज्यपाल करतात.

विधिमंडळाने मंजूर केलेल्या विधेयकाचे कायद्यात रूपांतर राज्यपालांच्या स्वाक्षरीने होते. राज्य विधिमंडळाचे अधिवेशन चालू नसताना तातडीने कायदा करण्याची गरज भासल्यास राज्यपाल वटहुकूम काढू शकतात. त्या वटहुकुमाला कायद्याइतकेच महत्त्व असते.

राज्यातील परिस्थितीबाबत राज्यपाल राष्ट्रपतींना वेळोवेळी माहिती देतात. राज्याचा कारभार संविधानानुसार चालत नाही किंवा राजकीय अस्थिरता निर्माण झाली आहे, असे वाटल्यास राज्यपाल राष्ट्रपतींना

आणीबाणी घोषित करण्याची शिफारस करू शकतात. असे झाल्यास त्या घटक राज्यात राष्ट्रपतींची राजवट प्रस्थापित होते. अशावेळी राज्यकारभाराची सूत्रे राज्यपालांच्या हाती येतात.

**मुख्यमंत्री :** राज्याच्या मुख्यमंत्र्यांची नेमणूक राज्यपाल करतात. विधानसभेत बहुमताचा पाठिंबा असेपर्यंत मुख्यमंत्री आपल्या पदावर राहू शकतात. विधानसभेने अविश्वासाचा ठराव मंजूर केल्यास मुख्यमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागतो.

**मुख्यमंत्र्यांचे अधिकार व कामे :** मुख्यमंत्री राज्याचा सर्व कारभार पाहतात. ते विधानसभेचे नेते असतात. मंत्रिमंडळाच्या कामकाजाची दिशा मुख्यमंत्रीच ठरवतात. सर्व प्रशासनावर देखरेख ठेवणे, मंत्र्यांमध्ये खातेवाटप करणे, एखादे खाते काढून घेणे, खात्यात फेरबदल करणे यांसारखे अधिकार मुख्यमंत्र्यांना असतात. मुख्यमंत्र्यांचा राजीनामा हा सर्व मंत्रिमंडळाचा राजीनामा मानला जातो.

**मंत्रिमंडळाचे अधिकार व कामे :** राज्यशासनाचे धोरण मंत्रिमंडळ ठरवते. राज्यशासनाची कामे निरनिराळ्या खात्यांमार्फत पार पाडली जातात. मंत्री आपापल्या खात्याचे प्रमुख असतात. मंत्रिमंडळाने ठरवलेल्या धोरणानुसार प्रत्येक मंत्री आपल्या खात्याचा कारभार करतात. आवश्यक ती विधेयके विधिमंडळात मंजुरीसाठी सादर करतात.

**राज्यपातळीवरील न्यायमंडळ :** प्रत्येक घटक राज्यासाठी एका उच्च न्यायालयाची तरतूद संविधानात आहे. एकापेक्षा अधिक घटक राज्ये व शेजारील संघशासित प्रदेश यांच्यासाठी एक सामाईक उच्च न्यायालयही असू शकते. उदाहरणार्थ, महाराष्ट्र व गोवा या दोन राज्यांसाठी सामाईक उच्च न्यायालय आहे.

**उच्च न्यायालय :** मुंबई उच्च न्यायालयात एक मुख्य न्यायाधीश आणि अन्य काही न्यायाधीश असतात. औरंगाबाद, नागपूर आणि पणजी

येथे मुंबई उच्च न्यायालयाची खंडपीठे आहेत. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची नेमणूक राष्ट्रपती करतात.

**उच्च न्यायालयाची कामे :** मूलभूत हक्कांच्या संरक्षणाची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयाप्रमाणेच उच्च न्यायालयांवरही असते.

कनिष्ठ न्यायालयाने कसे कामकाज करावे, याचे सर्वसाधारण नियम उच्च न्यायालय तयार करते. राज्यातील कनिष्ठ न्यायालयांनी दिलेल्या निर्णयांवर कोणी अपील केल्यास त्याचाही निवाडा उच्च न्यायालयात होतो.

उच्च न्यायालयातील निर्णय अमान्य असेल, तर नागरिकांना सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागता येते.

**महाराष्ट्र राज्याची वाटचाल :** महाराष्ट्र हे एक पुरोगामी राज्य आहे. महाराष्ट्राला समाजसुधारणेची मोठी परंपरा आहे. ही परंपरा पुढे चालू ठेवत सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी महाराष्ट्राने अनेक उपक्रम राबवले आहेत. महाराष्ट्रात दुर्बल घटकांच्या विकासासाठी महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ, महिला आर्थिक विकास महामंडळ यांसारख्या विकास महामंडळांची स्थापना करण्यात आली आहे. राज्य महिला आयोग, राज्य अल्पसंख्याक आयोग यांसारख्या आयोगांची स्थापना करण्यात महाराष्ट्राने पुढाकार घेतला आहे. महिलाविषयक स्वतंत्र धोरण ठरवून महाराष्ट्रात स्त्रियांच्या सबलीकरणाला चालना देण्यात आली आहे. मराठी भाषेच्या विकासासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, राज्य मराठी विकास संस्था यांसारख्या संस्थांची स्थापना करण्यात आली आहे. महाराष्ट्र हे आर्थिकदृष्ट्या प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते. उद्योग, व्यापार, सहकार व शेती या क्षेत्रांत महाराष्ट्राने मोलाची प्रगती केली आहे. मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक, सोलापूर यांसारखी औद्योगिक शहरे महाराष्ट्रात विकसित झाली. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात सहकारी चळवळीने मोठे योगदान केले आहे.

माहिती तंत्रज्ञानाचे क्षेत्रही महाराष्ट्रात विस्तारत असून महाराष्ट्रातील शहरीकरणाचे प्रमाणही दिवसेंदिवस वाढत आहे.

अशा प्रकारे महाराष्ट्र भारताच्या विकासात आणि राष्ट्र उभारणीत मोलाची भर घालत आहे.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.**

(अ) महाराष्ट्र राज्याची ........... रोजी निर्मिती झाली.
(१ मे १९६०, १ मे १९६१, १ मे १९६२)

(आ) महाराष्ट्रात विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन ........... येथे होते.
(मुंबई, औरंगाबाद, नागपूर)

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) राज्यशासनाचे घटक कोणते आहेत?

(आ) राज्यपाल विधानपरिषदेवर कोणत्या क्षेत्रांतील तज्ज्ञ व्यक्तींची नेमणूक करतात?

(इ) मुंबई उच्च न्यायालयाची खंडपीठे कोठे आहेत?

३. **दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) विधानसभेची कामे कोणती आहेत?

(आ) मुख्यमंत्र्यांची कामे कोणती आहेत?

**उपक्रम**


महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळातील मंत्री व त्यांची खाती यांचा तक्ता तयार करा.

## घटक राज्य आणि राजधानी

| अ. क्र. | घटक राज्य | राजधानी |
|---|---|---|
| १. | आंध्र प्रदेश | हैदराबाद |
| २. | अरुणाचल प्रदेश | इटानगर |
| ३. | आसाम | दिसपूर |
| ४. | बिहार | पाटणा |
| ५. | छत्तीसगढ | रायपूर |
| ६. | गोवा | पणजी |
| ७. | गुजरात | गांधीनगर |
| ८. | हरियाणा | चंदीगढ |
| ९. | हिमाचल प्रदेश | सिमला |
| १०. | जम्मू आणि काश्मीर | श्रीनगर(उन्हाळी), जम्मू (हिवाळी) |
| ११. | झारखंड | रांची |
| १२. | कर्नाटक | बंगळूर |
| १३. | केरळ | तिरुअनंतपुरम |
| १४. | मध्यप्रदेश | भोपाळ |
| १५. | महाराष्ट्र | मुंबई |
| १६. | मणिपूर | इंफाळ |
| १७. | मेघालय | शिलाँग |
| १८. | मिझोरम | ऐजॉल |
| १९. | नागालँड | कोहिमा |
| २०. | उडीसा | भुवनेश्वर |
| २१. | पंजाब | चंदीगढ |
| २२. | राजस्थान | जयपूर |
| २३. | सिक्कीम | गंगटोक |
| २४. | तमिळनाडू | चेन्नई |
| २५. | त्रिपुरा | आगरताळा |
| २६. | उत्तराखंड | डेहराडून |
| २७. | उत्तर प्रदेश | लखनऊ |
| २८. | पश्चिम बंगाल | कोलकता |

## संघशासित प्रदेश आणि राजधानी

| अ. क्र. | संघशासित प्रदेश | राजधानी |
|---|---|---|
| १. | अंदमान आणि निकोबार बेटे | पोर्ट ब्लेअर |
| २. | चंदीगढ | चंदीगढ |
| ३. | दादरा आणि नगर हवेली | सिल्व्हासा |
| ४. | दमण आणि दीव | दमण |
| ५. | दिल्ली | दिल्ली |
| ६. | लक्षद्वीप | कवरत्ती |
| ७. | पुदुच्चेरी | पाँडिचेरी |


संघशासन
राष्ट्रपती
संसद
लोकसभा
अध्यक्ष
राज्यसभा
सभापती
(उपराष्ट्रपती)
कार्यकारी मंडळ
पंतप्रधान व
मंत्रिमंडळ
न्याय मंडळ
सर्वोच्च न्यायालय




महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

रु. ७.००